# बृहन्मुंबई महानगरपालिका



**भूषण गगराणी**

**महानगरपालिका आयुक्त**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सन २०२५-२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज

[ अर्थसंकल्प 'ई' (फंड कोड - ३०) ]

दिनांक - ०४.०२.२०२५

# २०२५-२६

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून, आगामी वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज 'ई' (प्राथमिक शिक्षण) तयार करण्याची संधी मिळाली याचा मला अत्यानंद होत आहे.

स्वामी विवेकानंद यांचे '**शिक्षणात साध्य आणि साधन यांचा विचार करताना साध्य इतकेच साधनेकडे लक्ष देणे महत्वाचे आहे**' हे विचार समोर ठेऊन महानगरपालिकेमार्फत विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच अत्याधुनिक साधने उपलब्ध करुन देण्याकरिता आर्थिक तरतूदी प्रस्ताविण्यात आल्या आहेत.

सन २०२५- २६ चे अर्थसंकल्पीय अंदाज 'ई' (प्राथमिक शिक्षण), निधी संकेतांक ३० चा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६१ (क्यू) अन्वये प्राथमिक शिक्षण देणे हे महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत बदलत्या शिक्षण पध्दतीच्या अनुषंगाने आगामी दोन वर्षांचा विचार करुन दि.२३.१०.२०२४ रोजी आण्णाभाऊ साठे सभागृह, जिजामाता उद्यान, भायखळा (पूर्व) येथे सहविचार सभा घेऊन **'Vision 27'** ला सुरुवात करण्यात आली. यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०(NEP), राईट टू एज्यूकेशन (RTE), परख (PARAKH) अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सर्व क्षेत्रांचा विचार करुन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून **Mission SAMPURN (S** - School Infrastructure, **A** - Admission, **M** - Merit, **P** - Productivity, **U - U**niversalization of Education, **R** - Responsibility, **N** - Nutrition and Health**)** राबविण्याचे ठरले आहे.

सद्यस्थितीत सुरु असलेले शैक्षणिक उपक्रमांचे पुनर्विलोकन करुन **Mission SAMPURN** अंतर्गत विभाजन करण्यात आले असून यामध्ये आवश्यकतेनुसार नवीन शैक्षणिक उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. मिशन SAMPURN चे विवेचन खालीलप्रमाणे कार्यान्वित असेल.

**Mission School Infrastructure** : बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विद्यार्थ्यांना बालवाडी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, विशेष मुलांसाठीच्या शाळा, अध्यापक विद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये, सीबीएसई, आयसीएसई, आयजीसीएसई, आयबी मंडळाच्या शाळांतून शिक्षण देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच अत्याधुनिक भौतिक सुविधा

पुरविणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मिशन School Infrastructure अंतर्गत शालेय इमारतींची दुरुस्ती, दर्जोन्नती व पुनर्बांधणी करणे, संगणक प्रयोगशाळा अद्ययावतीकरण, आधुनिक बैठक व्यवस्था पुरविणे, क्रीडा संकुल, सीसीटीव्ही कॅमेरा, जलशुध्दीकरण यंत्रे इ. पायाभूत सुविधांबरोबरच आधुनिक शिक्षण पध्दतीचा अवलंब करण्याकरिता डिजीटल क्लासरुम, खगोलशास्त्रीय प्रयोगशाळा, ई-वाचनालय, कौशल्य विकास केंद्र यांसारख्या उपक्रमांचा समावेश करण्यात येत आहे.

**Mission Admission:** बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमधील पटसंख्येत वाढ करुन दर्जेदार शिक्षण देण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी शिक्षण विभागामार्फत "Mission Admission" ही मोहिम राबविण्यात येणार आहे. सदर उपक्रमाच्या माध्यमातून बहुसंख्य प्रवेशपात्र व शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे. नवीन प्रवेशाचे उद्धिष्ट साध्य झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी Mission Merit राबविण्यात येत आहे.

**Mission Merit:** महानगरपालिका शाळेत विद्यार्थी येईल, शिकेल व टिकेल या उक्तीच्या यशाकरीता प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे अध्ययन क्षमतेनुसार वर्गीकरण करुन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहेत. महानगरपालिका शाळेतील इयत्ता ३ री मधील शंभर टक्के विद्यार्थ्यांना लिहिता वाचता यावे हे ध्येय निश्चित करण्यात आले आहे, यासाठी मुलभूत क्रिया - वाचन, लेखन व गणिती क्रिया (Foundational Literacy and Numeracy) अंतर्गत इयत्ता २ री च्या विद्यार्थ्यांची प्रत्येक महिन्याच्या तिस-या शनिवारी चाचणी घेण्यात येत आहे. तसेच अध्ययन क्षमता उत्तम असणा-या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप परीक्षा, ऑलिम्पियाड परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा यांसारख्या स्पर्धात्मक परीक्षांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहीत करण्यात येत आहे. मार्गदर्शक गुरु आणि शिष्य (Mentor and Mentee) या संकल्पनेनुसार इयत्ता ८ वीत शिष्यवृत्ती मिळविलेल्या इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी महानगरपालिकेतील अधिकारी यांच्यामार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

महानगरपालिकेमार्फत उपलब्ध भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांकरीता आनंददायी शिक्षण व गुणवत्तापूर्ण उपक्रम या सर्वांची उपलब्धी म्हणून महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांच्या यशोगाथेकडे पहावे लागेल.

**Mission Productivity**: विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी वेगवेगळे भव्य असे मंच उपलब्ध करुन देणे हा या अभियानाचा उद्देश आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचा माध्यमिक शालांत परीक्षेचा अभिमानास्पद निकाल तसेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा/परीक्षा, गायन व नृत्य स्पर्धा, विविध स्पर्धात्मक परीक्षा, महापौर पुरस्कार व विविध कार्यशाळा यांसारख्या उपक्रमांच्या उपलब्धीतून महानगरपालिकेचा नावलौकीक दिसून येतो.

**Mission Universalization of Education**: समाजातील वंचित व दूर्बल घटकापर्यंत शिक्षण पोहचवून सर्व बालकांना स्पर्धात्मक आव्हाने पेलता यावीत याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी योजना, मुलींचा उपस्थिती भत्ता अशा विविध योजना राबविल्या जात आहेत.

**Mission Responsibility**: विद्यार्थ्यांना सुसंस्कृत आणि जबाबदार नागरीक बनविण्यात शिक्षकांची भूमिका महत्वाची आहे. याकरिता शिक्षकांना संगणक प्रशिक्षण, समर्थ व उर्जा उपक्रम, पहिले अक्षर कार्यशाळा यांसारख्या उपक्रमांतून तसेच विद्यार्थ्यांना करिअर समुपदेशन कार्यक्रम, स्काऊट-गाईड उपक्रम, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, रस्ता सुरक्षा दल अशा विविध उपक्रमांद्वारे प्रशिक्षण देऊन महानगरपालिका शिक्षण विभाग आपली जबाबदारी पार पाडीत आहे. तसेच पुढील शैक्षणिक वर्षापासून महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांकरिता राष्ट्रीय छात्र सेना (National Cadet Corps) उपक्रम सुरु करण्यात येणार आहे.

**Mission Nutrition And Health**: महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहून त्यांना उत्तम शारीरिक व मानसिक क्षमता प्राप्त व्हावी याकरिता महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, शालेय आरोग्य कार्यक्रम, राष्ट्रीय लोहयुक्त गोळ्या उपक्रम, निरोगी बालक स्पर्धा, मोफत चष्मे वाटप, सॅनिटरी नॅपकीन पुरवठा, ऑरगॅनिक फार्मिंग (किचन गार्डन) अशा आरोग्यपूर्ण योजना राबविल्या जात आहेत. तसेच नैराश्य, अपस्मार, अतिक्रियाशील, एकटे खेळण्याची आवड व प्रतिसाद न देणे इत्यादी आत्मकेंद्रीपणाची (Autism) लक्षणे असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता महानगरपालिकेमार्फत ऑटिझम थेरपी केंद्रे (Autism Therapy Centers) स्थापित करण्यात येणार आहेत. अशा प्रकारे मिशन SAMPURN यशस्वीपणे राबविण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत.

अर्थसंकल्प 'ई' निधी संकेतांक - ३० चे आकारमान आणि त्यामधील महसुली आणि भांडवली अर्थसंकल्पाचा गोषवारा पुढील तक्त्यात नमूद केला आहे. तसेच याबाबतची सविस्तर माहिती पृष्ठ क्र.२७ ते ३० वरील परिशिष्टे एक ते चार मध्ये देण्यात आली आहे.

**अर्थसंकल्पीय अंदाज 'ई' चे आकारमान**

**(निधी संकेतांक -३०)**

(₹ कोटीत)

| तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२५ | | सुधारित अंदाज २०२४-२५ | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पन्न / प्राप्ती | खर्च | उत्पन्न / प्राप्ती | खर्च | उत्पन्न / प्राप्ती | खर्च |
| **महसुली उत्पन्न** | ३१६७.६३ | | २९८९.६४ | | ३५४४.३४ | |
| **महसुली खर्च** | | ३१६७.६३ | | २९८९.६४ | | ३५४४.३४ |
| **भांडवली प्राप्ती** | ३३०.१९ | | ३३१.९१ | | ४११.३० | |
| **भांडवली खर्च** | | ३३०.१९ | | ३३१.९१ | | ४११.३० |
| **एकूण** | ३४९७.८२ | ३४९७.८२ | ३३२१.५५ | ३३२१.५५ | ३९५५.६४ | ३९५५.६४ |
| **खर्चापेक्षा जास्त होणारे उत्पन्न** | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **अर्थसंकल्प अंदाज "ई" चे आकारमान** | ३४९७.८२ | ३४९७.८२ | ३३२१.५५ | ३३२१.५५ | ३९५५.६४ | ३९५५.६४ |

अर्थसंकल्प 'ई' निधी संकेतांक - ३० अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे महसुली उत्पन्न व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹ ३१६७.६३ कोटी एवढे असून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता महसुली उत्पन्न व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹ ३५४४.३४ कोटी इतके प्रस्ताविण्यात आले आहे.

तसेच अर्थसंकल्प 'ई' निधी संकेतांक - ३० अंतर्गत सन २०२४-२५ या वर्षाच्या भांडवली अर्थसंकल्पात ₹ ३३०.१९ कोटीची प्रस्तावित करण्यात आलेली तरतूद सुधारित अंदाजात ₹ ३३१.९१ कोटी इतकी प्रस्तावित केली आहे. तसेच सन २०२५-२६ या वर्षासाठी भांडवली कामांच्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹ ४११.३० कोटी एवढी अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

## १. महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सुविधा:-

(अ) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मराठी, हिंदी, गुजराती, उर्दू, इंग्रजी, तेलगू, तमिळ व कन्नड अशा आठ माध्यमांच्या ९३८ प्राथमिक शाळेतील एकूण २,६०,५४४ विद्यार्थ्यांना (विद्यार्थी १,३३,४२२ व विद्यार्थीनी १,२७,१२२) ७,४०८ शिक्षकांमार्फत मोफत शिक्षण दिले जात आहे .

(ब) महानगरपालिकेच्या १९१ माध्यमिक शाळेतील ३८,४५० विद्यार्थ्यांना (विद्यार्थी १९,५६७ व विद्यार्थीनी १८,८८३) १,२४४ शिक्षकांमार्फत मोफत शिक्षण दिले जात आहे.

(क) महानगरपालिकेतर्फे विशेष मुलांसाठी १९ विशेष शाळा सुरु असून या शाळांमधून एकूण ८७६ विद्यार्थ्यांना (विद्यार्थी ६०० व विद्यार्थीनी २७६) ७८ शिक्षकांमार्फत शिक्षण दिले जात आहे.

(ड) महानगरपालिकेतर्फे ०२ अध्यापक विद्यालये व ०३ कनिष्ठ महाविद्यालये चालविली जातात ज्यामधून एकूण २९५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

(इ) महानगरपालिकेकडून अनुदान दिल्या जाणा-या ३७८ खाजगी अनुदानित शाळांमध्ये एकूण २२४७ शिक्षक कार्यरत आहेत. या शाळांमधून इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी पर्यंत एकूण १,०१,२८० विद्यार्थी (विद्यार्थी ५०,११९ व विद्यार्थीनी ५१,१६१) शिक्षण घेत आहेत.

(ई) महानगरपालिकेमार्फत सद्यस्थितीत बालवाडीचे ९०० वर्ग, एमपीएसचे ११० वर्ग, सीबीएसई, आयसीएसई, आयबी व आयजीसीएसई मंडळांचे ९३ वर्ग असे एकूण १,१०३ पूर्व प्राथमिक वर्ग सुरु आहेत. त्यामध्ये एकूण ४१,५८५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

## २. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील शैक्षणिक /अतिरिक्त शैक्षणिक उपक्रमांची उपलब्धी:

### २.१ शैक्षणिक उपक्रम व प्रकल्प:

- **आयसीएसई, सीबीएसई, आयजीसीएसई व आयबी शिक्षण मंडळाच्या शाळांची उभारणी:**
  - सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात (१) मुंबई पब्लिक स्कूल शांती नगर -जी/ दक्षिण (२) मुंबई पब्लिक स्कूल नटवर पारेख कंपाऊंड - एम/पूर्व-१ (३) मुंबई पब्लिक स्कूल मालवणी टाऊनशिप - पी/उत्तर (४) मुंबई पब्लिक स्कूल वीर

सावरकर मार्ग वर्षानगर - एस विभाग या ४ नवीन सीबीएसई शाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत.

- ➢ सद्यस्थितीत सीबीएसई मंडळाच्या १८ तसेच आयसीएसई, आयजीसीएसई व आयबी मंडळाची प्रत्येकी ०१ अशा एकूण २१ शाळा सुरु आहेत. या सर्व शाळांमध्ये नर्सरी ते इयत्ता १० वी पर्यंत एकूण ११,७३६ विद्यार्थी (विद्यार्थी ६,२७९ व विद्यार्थीनी ५,४५७) शिक्षण घेत आहेत.

- सन २०२४-२५ मध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता के/पूर्व विभागात नटवर नगर महानगरपालिका विशेष शाळा सुरु करण्यात आली आहे.

## २.२ अतिरिक्त शैक्षणिक उपक्रम व प्रकल्प

- **चित्रकला स्पर्धा**: कला विभागामार्फत बालचित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आणि प्रदर्शन, शिववैभव गडदुर्ग (किल्ले) शिल्पकला स्पर्धा, छायाचित्रण कार्यशाळा व स्पर्धा, आर्टिस्ट कॅम्प, कला शिक्षक कार्यशाळा, इ. योजना व उपक्रम राबविण्यात येतात. महाराष्ट्र राज्य शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा २०२४ मध्ये महानगरपालिका शाळांतील ३,९९१ विद्यार्थी एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत व २,७१४ विद्यार्थी इंटरमीजिएट ग्रेड परीक्षेत प्रविष्ट झाले आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका व दिव्याज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ''बच्चे बोले मोरया'' (BBM) उपक्रमांतर्गत टेराकोटा मातीकाम श्री गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेत २,५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

 जागतिक किर्तीचे व्यंगचित्रकार हिंदु हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख **मा. बाळासाहेब ठाकरे** यांच्या जयंती निमित्त प्रतिवर्षी आयोजित करण्यात येणारी बालचित्रकला स्पर्धा या वर्षी दि.१२.०१.२०२५ रोजी भरविण्यात आली. यामध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता १०वी च्या एकूण ८८,७८९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेतील विजेत्यांना प्रतिवर्षाप्रमाणे रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ५०लाख

- **संगीत अकादमी**: संगीत व कला विभागामार्फत सन २०२४-२५ मध्ये समूहगान शिबीर, लोकनृत्य शिबिर, नाट्य शिबीर, बासरीवादन, कलात्मक उपक्रमांमध्ये आषाढी एकादशी, अकादमीचे संस्थापक कै. म.वा.देसाई (माजी आयुक्त) स्मृतिदिन इ. उपक्रम राबविण्यात आले. तसेच संगीत सप्ताहाचे आयोजन करुन त्यामध्ये सुगम संगीत, शास्त्रीय संगीत, नाट्य संगीत, शास्त्रीय नृत्य इ. विषय अंतर्भूत करण्यात आले.

  गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेत यावर्षी महानगरपालिकेचे ४५० विद्यार्थी प्रथम व द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

  अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १० लाख

  अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ २ लाख

- **कार्यानुभव**: कार्यानुभव विभागामार्फत प्रतिवर्षी राखी स्पर्धा, कागदी पिशवी स्पर्धा, भेटकार्ड स्पर्धा, आकाश कंदील स्पर्धा, पतंग स्पर्धा, मध्यवर्ती विद्यार्थी-शिक्षक कलाकृती स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन केले जाते. कार्यानुभव प्रशिक्षण व कार्यशाळेमार्फत कार्यानुभव शिक्षकांकरिता "कागदाच्या लगद्यापासून कागद, पुठ्ठा तयार करणे" या विषयाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून एकूण १५० शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. सदर विविध उपक्रम सन २०२५-२६ मध्ये देखील सुरु राहणार आहेत.

  अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १३ लाख

- **शारीरिक शिक्षण**: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांची शारीरिक सुदृढता वाढविण्यासाठी तसेच अष्टपैलु खेळाडू तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना सांघिक व वैयक्तिक खेळांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

  मुंबई क्रिकेट असोशिएशन व दादर पारसी झोराष्ट्रीयन क्रिकेट क्लब यांच्याकडून ७९० विद्यार्थ्यांना क्रिकेटचे प्रशिक्षण देण्यात आले असून अंतिम स्पर्धेकरीता ३६ विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे.

सन २०२४-२५ मध्ये ११० विद्यार्थ्यांना एक वर्षाकरीता विनामूल्य जलतरणाचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी आयोजित जलतरण स्पर्धेमध्ये ३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ५० लाख

अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ ३० लाख

- **इंद्रधनुष्य (टॅलेंट शो)**: 'इंद्रधनुष्य' या कार्यक्रमाद्वारे महानगरपालिका विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध होत आहे. सन २०२५-२६ मध्येही विद्यार्थ्यांच्या कला, संगीत, वादन, नृत्य व क्रीडा क्षेत्रातील गुणांवर आधारीत 'इंद्रधनुष्य' **(टॅलेंट शो)** हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

## २.३ स्पर्धात्मक परीक्षा:

- **शिष्यवृत्ती परीक्षा** : : सन २०२३-२४ मध्ये इयत्ता ५ वी चे ३,५२५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी ८२६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ३१७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तसेच ८ वी चे ३,३६५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ५७४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून २८८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता ५ वी चे ४,६२७ व इयत्ता ८वी चे ३,९१८ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ५६ लाख

- **ऑलिम्पियाड परीक्षा**: सन २०२३-२४ मध्ये घेण्यात आलेल्या इंग्रजी, गणित व विज्ञान प्रायमरी ऑलिम्पियाड परीक्षेमध्ये राष्ट्रीय स्तरावर ०४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसह सुवर्णपदके, १८ विद्यार्थ्यांना रौप्यपदके व ३१ विद्यार्थ्यांना कांस्यपदके प्राप्त झाली. तसेच, आंतरराष्ट्रीय फायनान्स ऑलिम्पियाड परीक्षेत ०१ विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

  सन २०२४-२५ मध्ये इंग्रजी, गणित व विज्ञान प्रायमरी ऑलिम्पियाड परीक्षेमध्ये इंग्रजी विषयात ४०० , गणित विषयात ८०० व विज्ञान विषयात ८०० विद्यार्थी तसेच

आंतरराष्ट्रीय फायनान्स ऑलिम्पियाड परीक्षेकरीता इयत्ता ९वी चे ८१ विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ४० लाख

- **प्रज्ञाशोध परीक्षा**: सन २०२३-२४ मध्ये इयत्ता ३री, इयत्ता ४थी, इयत्ता ६वी व इयत्ता ७वीचे एकूण १७,४९३ विद्यार्थी प्रज्ञाशोध मुख्य परीक्षेस प्रविष्ट झाले होते त्यापैकी एकूण १४,५३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## २.४ आधुनिक शिक्षण पध्दतीचा अवलंब:

- **Gamifield Learning App**: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळेतील इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या एकूण १९,४०१ टॅबमध्ये खेळातून शिक्षण या संकल्पनेनुसार Gamifield Learning App ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच सन २०२५-२६ मध्ये इयत्ता ८ वी व इयत्ता ९वी च्या विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या एकूण ३२,६५९ टॅबमध्ये Gamifield Learning App ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- **शब्दकोश (Dictionary)** : महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शब्दकोश (मॉडर्न स्कूल डिक्शनरी) तसेच शिक्षकांसाठी प्रत्येक शाळेला एक ॲडव्हान्स डिक्शनरी वितरणाचे काम सुरु करण्यात आले आहे.
- **खगोलशास्त्रीय प्रयोगशाळा**: अवकाशात घडणाऱ्या विविध खगोलीय घटनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण होऊन त्यांच्या खगोलीय ज्ञानाच्या कक्षा वृध्दींगत करण्याकरिता तसेच वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या वाढीकरिता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत प्रायोगिक तत्वावर खगोलशास्त्रीय प्रयोगशाळा उभारणी करण्याचे काम सुरु आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १० लाख

- **ई-वाचनालय**: सन २०२४-२५ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ५० प्राथमिक शाळांमध्ये ई-वाचनालय कार्यान्वित करण्यात आली असून याबाबत शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

  अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १० लाख

- **डिजीटल क्लासरुम** : सन २०२४-२५ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील एकूण ७,९३४ वर्गखोल्यांपैकी ३,८१४ वर्गखोल्याना LED Interactive Panel द्वारे डिजीटल क्लासरुम करण्यात आले असून उर्वरीत ४,१२० वर्गखोल्या टप्प्याटप्याने डिजीटल करण्यात येणार आहेत.

  अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ २१.२२ कोटी
  अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ ४.०७ कोटी

- **कौशल्य विकास केंद्र** : महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमध्ये १२ प्रकारच्या अभ्यासक्रमांसह एकूण २२० कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्यात आली असून विद्यार्थ्यांसाठी सन २०२४-२५ करिता प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आलेले आहेत.

  अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ ५० लाख

- **ऑरगॅनिक फार्मिंग (किचन गार्डन)**: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर विभागातील १०० शाळांमध्ये ऑरगॅनिक फार्मिंग (किचन गार्डन) ही संकल्पना यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका व जिल्हा नियोजन सामिती - मुंबई उपनगर, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त योगदानाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगर विभागातील शाळांमध्ये ऑरगॅनिक फार्मिंग (किचन गार्डन) ही संकल्पना राबविण्यात येणार आहे.

## २.५ स्वयंसेवी संस्थेच्या सहभागातून सुरु असलेले उपक्रम:

- **पोक्सो (POCSO) कायद्याबाबतचे मार्गदर्शन** : महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासन व इतर सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शिक्षक व पालकांकरिता पोक्सो (POCSO) कायद्याबाबतचे मार्गदर्शन करणारी व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत.

- **उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरिता करिअर समुपदेशन कार्यक्रम: 'अंतरंग फाऊंडेशन'** यांच्या लोकसहभागातून बृहन्मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळांमधील इयत्ता ९वी व इयत्ता १०वीच्या विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात येत आहे. याचा लाभ आतापर्यंत इयत्ता ९वीच्या २४,०४२ व इयत्ता १०वीच्या १७,०८४ इतक्या विद्यार्थ्यांनी घेतला आहे.
- **पहिले अक्षर:** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पहिले अक्षर या संस्थेमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या इंग्रजी भाषेसंबंधी गुणवत्तेत वाढ करण्याकरिता शिक्षकांसाठी कार्यशाळा सुरु आहे.

## २.६ प्रशिक्षणे व उपक्रम (सन २०२४-२५)

- **स्काऊट व गाईड उपक्रम:** स्काऊट-गाईड ही एक जागतिक चळवळ असून यामध्ये शीलसंवर्धन, आरोग्य, हस्तव्यवसाय आणि सेवा या चतु:सुत्रीवर आधारीत अभ्यासक्रम राबविण्यात येतो.
  - ➢ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये स्काऊट-गाईड चळवळीमध्ये ९२,६५४ विद्यार्थी व २,६१२ शिक्षकांची नोंद झाली आहे. तसेच एकूण ५६१ विद्यार्थी (कब-१५०, बुलबुल-१५०, स्काऊट-१२२, गाईड-१३९) राज्यस्तरीय राज्यपुरस्कार चाचणी शिबीरामध्ये सहभागी होणार आहेत.
  - ➢ स्वच्छता मोहिम, हर घर तिरंगा, पाणी वाटप व प्रथमोपचार, अनंत चतुर्दशी सेवाकार्य, हज यात्रा सेवाकार्य, माऊंट मेरी सेवाकार्य, महालक्ष्मी सेवाकार्य यांसारख्या कार्यक्रमात स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.
  - ➢ भारत स्काऊट गाईड चळवळीला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'डायमंड ज्युबिली' राष्ट्रीय जांबोरीचे आयोजन दि.२८.०१.२०२५ ते ०३.०२.२०२५ या कालावधीत तामिळनाडू राज्यातील त्रिची व तिरुचिरापल्ली या ठिकाणी करण्यात आले आहे. यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका स्काऊट व गाईड विभागातील १६ स्काऊट्स,१६ गाईड्स व ४ युनिट लिडर्स सहभागी होणार आहेत.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ४० लाख

अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ ३० लाख

- **रस्ता सुरक्षा दल (आर.एस.पी.)**: रस्ता सुरक्षा दलामध्ये प्राथमिक शाळांतील ९,९६० विद्यार्थी व माध्यमिक शाळांतील १,०४० विद्यार्थी असे एकूण ११,००० विद्यार्थी सक्रीय आहेत. या विद्यार्थ्यांना वाहतूक पोलिस तसेच तज्ज्ञ प्रशिक्षक यांच्यामार्फत वाहतूक नियमांचे, रस्ता सुरक्षेचे नियम व ट्रॅफीक सिग्नल नियमांचे प्रशिक्षण देऊन चांगला व कर्तव्यदक्ष नागरीक बनविण्याचा प्रयत्न केला जातो.

  अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १२ लाख
  अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ ५ लाख

- **आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण**: नैसर्गिक व मानवी आपत्तीपासून विद्यार्थ्यांना स्वत:चे संरक्षण करता यावे, याकरिता आपत्कालीन व्यवस्थापन विभागातर्फे इयत्ता ६वी ते इयत्ता १०वी च्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना विविध माध्यमातून आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाते.

## ३ शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व दर्जा सुधारण्यासाठी मुलभूत तसेच पायाभूत भौतिक सुविधा

- **शालेय इमारतींची दुरुस्ती, दर्जोन्नती व पुनर्बांधणी**: महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीच्या एकूण ४७९ शालेय इमारती आहेत.

**दुरुस्ती व दर्जोन्नती** : सन २०२३-२४ वर्षातील दुरुस्ती व दर्जोन्नतीची ४४ कामे व सन २०२४-२५ वर्षामध्ये दि.२५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आलेली दुरुस्ती व दर्जोन्नतीची २२ कामे अशी एकूण ६६ कामे प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी मार्च २०२५ पर्यंत एकूण ४० कामे पूर्ण करण्यात येणार असून उर्वरित २६ कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येतील.

**पुनर्बांधणी व नवीन बांधकामे** : सन २०२३-२४ वर्षातील पुनर्बांधणी व नवीन बांधकामांची ०८ कामे व सन २०२४-२५ वर्षामध्ये दि.२५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आलेली पुनर्बांधणी व नवीन बांधकामांची ७ कामे अशी एकूण १५ कामे प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी मार्च २०२५ पर्यंत एकूण ०५

कामे पूर्ण करण्यात येणार असून उर्वरित १० कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येतील.

अशा प्रकारे मार्च २०२५ पर्यंत दुरुस्ती, दर्जोन्नती, पुनर्बांधणी व नवीन बांधकामांची एकूण ४५ कामे पूर्ण करण्यात येणार असून उर्वरित ३६ कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येतील.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ३००.७१ कोटी

- **परिमंडळनिहाय ठेकेदारांची नियुक्ती** (Zonal Contractor): महानगरपालिका शालेय इमारतींच्या किरकोळ व तात्काळ स्वरुपाच्या दुरुस्तीची कामे करण्यासाठी पुढील दोन वर्षांकरिता परिमंडळनिहाय ठेकेदारांची नियुक्ती करण्याकरिता निविदा प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ४ कोटी

- **हाऊसकीपिंग**: सन २०२२ ते २०२५ या कालावधीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूण ४६९ शालेय इमारतींची देखभाल, स्वच्छता व सुरक्षा करण्यासाठी कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १६० कोटी

- **संगणक प्रयोगशाळा अद्ययावतीकरण**: सन २०२५-२६ मध्ये ११२ संगणक प्रयोगशाळांचे अद्ययावतीकरण करण्यात येणार आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ६ कोटी
अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹१.२३ कोटी

- **क्रीडा संकुल**: महानगरपालिका परिक्षेत्रातील मध्यवर्ती ठिकाणे निश्चित करुन मुंबई शहर, पूर्व उपनगर व पश्चिम उपनगर यांजकरिता प्रत्येकी एक अशी एकूण ०३ मुख्य क्रीडा संकुले व ३२ उपकेंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

- **सी.सी.टी.व्ही.कॅमेरा** : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर विभागातील शालेय इमारतींमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तसेच सन २०२५-२६ मध्ये

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगर विभागातील शालेय इमारतींमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १३ कोटी

- **खुली व्यायाम शाळा** : जिल्हा नियोजन समिती-मुंबई उपनगर, महाराष्ट्र शासन यांच्या योगदानाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगर जिल्ह्यातील एकूण २०० शाळांमध्ये विद्यार्थ्यांकरिता खुल्या व्यायाम शाळा स्थापन करण्यात आल्या आहेत.

## ४. सन २०२४-२५ मधील यशस्वी वाटचाल:-

- मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये ७९ महानगरपालिका माध्यमिक शाळांचा निकाल १०० टक्के लागला असून एकूण २४८ शाळांचा सरासरी निकाल ९१.५६ टक्के इतका लागला आहे.
- रोप मल्लखांब या खेळामध्ये चिकूवाडी सीबीएसई शाळेतील कुमारी पूर्वा आंबोळकर या विद्यार्थीनीने राज्यस्तरीय स्पर्धा सन २०२४-२५ मध्ये सुवर्ण पदक पटकावले. सदर विद्यार्थीनीची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे.
- वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालय आयोजित, वन्यजीव सप्ताह २०२४ चित्रकला स्पर्धेत महानगरपालिकेच्या ०५ विद्यार्थ्यांना बक्षीस प्राप्त झाले.
- केंद्र सरकारच्या उर्जा संवर्धन चित्रकला स्पर्धेत अंधेरी पश्चिम एमपीएस शाळेतील तीन विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर निवड करण्यात आली आहे. त्यापैकी कुमारी आंचल यादव या विद्यार्थीनीची राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आली आहे.
- ०८ जिल्हयांच्या विभागीय जलतरण स्पर्धेत मुंबई पब्लिक स्कूल मिठागर सीबीएसई शाळेतील कुमारी किमया संतोष साटम या विद्यार्थीनीने ३ रा क्रमांक पटकावला असून सीबीएसई शाळांच्या South Zone National Champion स्पर्धेत ७ वा क्रमांक पटकावला.
- राष्ट्रीय रग्बी स्पर्धेत ४ विद्यार्थ्यांची महाराष्ट्र संघात निवड झाली.
- **National Center for Performing Art (NCPA)** या संस्थेमार्फत आयोजित नाटक स्पर्धेत नाटक सादर करण्यासाठी मुंबईतील एकूण १६ शाळांची निवड झाली होती त्यापैकी ७ शाळा ह्या महानगरपालिकेच्या असून सदर शाळांना **National Center for**

**Performing Art (NCPA)** या संस्थेमार्फत नाटकांच्या रंगमंचावरील सादरीकरणाचे व रंगमंचामागील नियोजनाचे प्रशिक्षण देखील देण्यात आले आहे.

- राज्य शासन व इतर संस्थांमार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेतील महानगरपालिका विद्यार्थ्यांची यशस्वी कामगिरी पुढीलप्रमाणे -
  - राज्यस्तर - योगासन स्पर्धेत ०३, सायकलिंग स्पर्धेत ०१, एथिलेटिक्स स्पर्धेत ०१, मल्लखांब स्पर्धेत ०२, ज्युडो स्पर्धेत ०२, तायक्वांदो स्पर्धेत ०१ व बॉक्सिंग स्पर्धेत ०४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.
  - राष्ट्रीय स्तरावर - कुस्ती स्पर्धेमध्ये ०३, तायक्वांदो स्पर्धेत ०१, नेटबॉल स्पर्धेत०१, ज्युडो स्पर्धेत ०१, बास्केटबॉल स्पर्धेत ०१ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.
- ज्युडो या खेळ प्रकारात राष्ट्रीय स्तरावर खेरवाडी एमपीएस शाळेतील कुमार अभिषेक यादव या विद्यार्थ्यास कांस्यपदक मिळाले.
- **महापौर पुरस्कार**: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक, माध्यमिक तसेच खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील एकूण ५० मुख्याध्यापक / शिक्षकांना महापौर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १३ लाख

## ५. सन २०२५-२६ मध्ये देखील सुरु राहणाऱ्या कल्याणकारी योजना व उपक्रम.

- **शालोपयोगी वस्तूंचा मोफत पुरवठा**: सन २०२४-२५ व सन २०२५-२६ करिता शालोपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्याकरीता कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, सन २०२४-२५ करिता महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचा १०० टक्के पुरवठा करण्यात आलेला आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १४० कोटी

अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ ३५ कोटी

- **मुलींचा उपस्थिती भत्ता (विद्यार्थीनींसाठी मुदत ठेव योजना)**: **'मुलींचा उपस्थिती भत्ता'** या योजने अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये इयत्ता १ली ते इयत्ता ८वी मध्ये

शिकत असलेल्या विद्यार्थीनींना प्रवेशाच्या प्रमाणानुसार किमान ₹ १,०००/- व कमाल ₹ ५,०००/- इतक्या रकमेची मुदतठेव प्रमाणपत्रे भारतीय डाक विभागाद्वारे देण्याची कार्यवाही सुरु आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ७.१६ कोटी
अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ ३९ लाख

- **दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना :**
  - **शिष्यवृत्ती :** दोन्ही सत्र परीक्षेत 'ब' किंवा त्यापेक्षा वरील श्रेणी प्राप्त करणा-या इयत्ता १ ली ते इयत्ता १० वीच्या सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना ₹ १,०००/- ते ₹२,०००/- पर्यंत वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या निकालावर आधारीत २,८३२ लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची कार्यवाही सन २०२४-२५ मध्ये सुरु आहे.

    अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ २५ लाख
  - **उपस्थिती भत्ता योजना :** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण ३,५९४ दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रतिदिन ₹ २०/- याप्रमाणे उपस्थिती भत्ता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

    अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १.७६ कोटी

- **अत्याधुनिक बैठक व्यवस्था (एमडीएफ डेस्क-चेअर्स) :** महानगरपालिका शाळांतील नर्सरी ते इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेसाठी २४,१७० डेस्क व ३९,१७८ चेअर्स खरेदीची निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे.

  अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ८.९१ कोटी
  अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ ३.१२ कोटी

- **शालेय विद्यार्थ्यांसाठी बेस्ट बस अंतर्गत मोफत प्रवास :** महानगरपालिकेच्या इयत्ता १ली ते इयत्ता १०वी तील गणवेषधारी विद्यार्थ्यांना त्यांच्या निवासस्थानापासून ते शाळेपर्यंत बेस्ट मार्फत मोफत बस प्रवास सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच ज्या मार्गावर बेस्ट बसची सुविधा उपलब्ध नाही अशा मार्गांवर बेस्टमार्फत विशेष बस सेवा पुरविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये (जुलै २०२४

अखेरपर्यंत) प्राथमिक शाळांतील १४,९०० व माध्यमिक शाळांतील ४,८२३ अशा एकूण १९,७२३ विद्यार्थ्यांना 'चलो कार्ड' चे वितरण करण्यात आले आहे..

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ६ कोटी
अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ २.७० कोटी

- **शालेय आरोग्य कार्यक्रम**: महानगरपालिका शाळांतील सर्व विद्यार्थ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी शालेय आरोग्य विभागामार्फत केली जाते. लक्षणे व आजार असणाऱ्या महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना महानगरपालिका दवाखाना / रुग्णालये येथे संदर्भित करुन त्यांवर मोफत तपासणी व उपचार करण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये माहे जून २०२४ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत ३५,२६२ विद्यार्थी व ३४,८२३ विद्यार्थीनी अशा एकूण ७०,०८५ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे.

- **सॅनेटरी नॅपकीन**: महानगरपालिका शाळेतील विद्यार्थीनींना नियमित सॅनिटरी नॅपकीन पुरवठा करण्यात येत आहे. तसेच सन २०२५-२६ करिता सॅनिटरी नॅपकीन पुरविण्याबाबतची ई-निविदा प्रक्रिया उपप्रमुख अभियंता (मखखा) कार्यालयामार्फत कार्यान्वित आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १९ लाख
अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ ३० लाख

- **प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना**: केंद्र शासन व राज्य शासन पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत विहित नियमांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका शाळा व खाजगी अनुदानित शाळांतील इयत्ता १ली ते इयत्ता ८वी च्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जाते.

## ६. अनुदान

- **खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान**: बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी संस्थांच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या इयत्ता १ली ते इयत्ता ४ थी च्या ३७८ प्राथमिक

शाळांना 'अनुदान सहाय्य संहिता १९६८' नुसार महानगरपालिकेमार्फत अनुदान दिले जाते.

सन २०२५-२६ पासून ९२ विनाअनुदानित (इंग्रजी माध्यम वगळून) शाळांना ६०टक्के (३० टक्के राज्य शासन व ३० टक्के महानगरपालिका) अनुदान देण्यात येणार आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (वेतन) - ₹ ४४३.३९ कोटी

अर्थसंकल्पीय तरतूद (निवृत्ती वेतन योजना) - ₹ २४० कोटी

- **ग्रंथसंग्रहालयांना अनुदान** : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची एकूण २९ सार्वजनिक ग्रंथालये 'मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय' या संस्थेमार्फत चालविली जात आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील ग्रंथालयाची सभासद संख्या विचारात घेऊन १८ ग्रंथसंग्रहालयाकरिता मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयास ₹ ४५.२० लाख इतके अनुदान देण्यात आले आहे..

  तसेच मुंबई शहराचा मानबिंदू असलेल्या 'दि एशियाटिक सोसायटी' या संस्थेस चालू आर्थिक वर्षात ₹ ७५ लाख इतके अनुदान देण्यात आले आहे.

  अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ २ कोटी

- **बालवाडी वर्गांना अनुदान**: शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये बालवाडी तसेच मुंबई पब्लिक स्कूल, सीबीएसई, आयसीएसई, आयबी व आयजीसीएसई यांच्या एकूण १०९७ पूर्व प्राथमिक वर्गांमध्ये ४२,९१९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी वय वर्ष ६ पुर्ण झालेल्या एकूण २०४१४ विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये महानगरपालिकेच्या शाळांमध्ये इयत्ता १ली मध्ये प्रवेश घेतला आहे.

  अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १८.४६ कोटी

## ७. आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील नवीन योजना व प्रकल्प

- **स्टेम रोबोटीक्स (STEM Robotics)** : विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाबाबत सखोल रुची निर्माण होऊन त्यांची विश्लेषणात्मक व सर्जनशील विचार करण्याची क्षमता सुधारण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्टेम रोबोटीक्स

(Science, Technology , Engineering and Mathematics Robotics) प्रयोगशाळा स्थापित करण्याचे नियोजित आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १० कोटी

- **सायबर साक्षरता**: विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकासासाठी इंटरनेटचा वापर करताना कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी हे समजण्याकरीता तसेच वैयक्तिक, शैक्षणिक आणि व्यवसायिक कामकाजात इंटरनेटचा वापर करताना होणारी ऑनलाईन फसवणूक टाळण्याकरीता सायबर साक्षरता हा प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ११.८० कोटी

अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ ११.८० कोटी

- **विद्यार्थी मूल्यांकन प्रणाली (Student Assesement System)**: इयत्ता १ली ते इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांचे नियमित मूल्यमापन करणे हे महत्वपूर्ण आव्हान आहे. तसेच विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा, ऑलिम्पियाड परीक्षा तसेच नियमित मूल्यमापनात शैक्षणिक प्रगती सुधारण्यासाठी नियमित व सातत्यपूर्ण मूल्यमापनाची आवश्यकता आहे. त्याचे निराकरण करण्यासाठी कार्यक्षम अशी मूल्यांकन व्यवस्थापन प्रणाली तयार करण्यात येत आहे. ही प्रणाली शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेचे मूल्यांकन करण्यास मदत करेल.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १.७० कोटी

- **पूरक पोषण आहार**: विद्यार्थ्यांचा सुयोग्य शारीरिक विकास व्हावा, याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील बालवाडी ते इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना पुरक आहार देण्याचा शिक्षण विभागाचा मानस आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १०१.३७ कोटी

अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ १६ कोटी

- **व्यवसाय पुस्तिका**: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील इयत्ता १ ली ते इयत्ता ५वीच्या विद्यार्थ्यांना विषयनिहाय घटकांची संकल्पना स्पष्ट होणे, कवितांचा मतितार्थ

विद्यार्थ्यांना समजणे, शब्दांचे अर्थ ग्रहण करणे, लेखन कौशल्य विकसित होणे, विज्ञानाच्या संकल्पना समजणे, विविध गणिती क्रियांच्या सरावासाठी व परीक्षेच्या दृष्टीने विविध प्रकारचे प्रश्न सोडविण्याचा सराव करण्याकरिता सन २०२५-२६ मध्ये सर्व प्रमुख विषयांच्या व्यवसाय पुस्तिकांचे वितरण करण्याचे प्रस्तावित आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ४.४३ कोटी

- **स्कॉलरशिप मार्गदर्शक पुस्तिका**: महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता वाढविण्याकरीता विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावरच परीक्षेबाबत योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. याकरिता सन २०२५-२६ मध्ये इयत्ता ५वी व इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या पूर्वतयारी करण्याकरिता शिष्यवृत्ती मार्गदर्शक पुस्तिका वितरण करण्याचे प्रस्तावित आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ २७ लाख

- **व्याकरणाची पुस्तके**: महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषेच्या लेखन कौशल्य व अस्खलित संभाषणाकरीता व्याकरणाची गरज लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता ५ वी ते इयत्ता ८वी च्या सर्व माध्यमाच्या विद्यार्थ्यांकरीता इंग्रजी व्याकरणाची पुस्तके उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ३.५४ कोटी

- **विज्ञान पार्क**: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २ शालेय इमारतींमध्ये प्रायोगिक तत्त्वावर विज्ञान पार्क स्थापन करण्याचे नियोजित आहे.

- **इंग्रजी भाषा प्रयोगशाळा**: शालेय इमारतींमध्ये सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या संगणक प्रयोगशाळा, ई-वाचनालय व शैक्षणिक टॅब इ. बरोबरच एक नवीन स्वतंत्र इंग्रजी भाषा प्रयोगशाळा स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (माध्यमिक) - ₹ १० कोटी

- **फायर कंट्रोल स्टीकर**: विद्युत उपकरणाच्या बटण असलेल्या बोर्डमध्ये कोणत्याही कारणाने आगीची ठिणगी पडल्यास त्याचे रुपांतर आगीत होऊ नये यासाठी फायर कंट्रोल

स्टीकर हे विद्युत उपकरण बसविण्यात येणार आहे. त्याद्वारे आगीची ठिणगी पडताच क्षणी यंत्रणा कार्यान्वित होऊन आग त्वरित विझविली जाईल.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ ४ कोटी

- **गंधवेध यंत्र** : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर विभागातील १०० व उपनगर विभागातील ४०० शालेय इमारतींमध्ये स्वच्छतागृहांसाठी प्रत्येक इमारतीस १० असे एकूण ५००० गंधवेध यंत्र स्थापित करण्याचे प्रस्तावित आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १ कोटी

- **व्हाईट बोर्ड**: शाळेमध्ये सद्यस्थितीत बसविण्यात आलेले जिर्ण व दुरावस्था झालेले फळे/ बोर्ड बदलून शिक्षक व विद्यार्थ्यांना वापरास सुयोग्य असे फळे/ बोर्ड बसविण्यात येणार असून सन २०२५-२६ मध्ये आवश्यकतेनुसार व्हाईट बोर्ड खरेदी करण्यात येणार आहेत.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १० लाख

- **जादुई पेटारा (ज्ञानपेटी)**: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला व कृतीशीलतेला वाव देऊन त्यांना आनंददायी शिक्षण मिळावे याकरीता शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये बालवाडीतील विद्यार्थ्यांना जादुई पेटारा उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच जादुई पेटारा **(ज्ञानपेटी)** ही संकल्पना इयत्ता १ ली व इयत्ता २ री करिता टप्प्याटप्प्याने राबविण्यात येईल.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १० लाख

- **बोलक्या भिंती** : विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमातील एखादी संकल्पना स्पष्ट करीत असताना सदर आशयाचे चित्र दाखविले असता ती संकल्पना विद्यार्थ्यांस लवकर समजण्यास मदत होईल. याकरिता शालेय इमारतीच्या संरक्षक भिंतीवर आतल्या बाजूस विद्यार्थ्यांना शैक्षणिक, नैतिक मूल्ये व सामाजिक जबाबदारीचे संदेश देणारे चित्र चित्रित करण्यात येणार आहेत.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १२.६० कोटी

- **आर्थिक साक्षरता मिशन (Mission Financial Literacy):** दैनंदिन आर्थिक व्यवहारातील बजेटींग, गुंतवणूक, विमा, कर्ज आणि व्याज या संकल्पनांवर आधारीत अध्यापन साहित्य, क्षेत्रभेटी व प्रशिक्षण याद्वारे इयत्ता ६वी ते इयत्ता ९वीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक शिक्षणाचे धडे देण्याचा अभिनव उपक्रम सन २०२५-२६ मध्ये महानगरपालिका शिक्षण विभागाद्वारे राबविण्यात येणार आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद (प्राथमिक) - ₹ १२ कोटी

## ८. राज्य शासनाकडून अनुदान

- **प्राथमिक शिक्षण:** सन २०२५-२६ मध्ये प्राथमिक शाळांच्या खर्चापोटी अनुज्ञेय ५० टक्के अनुदान ₹ ५५७.४१ कोटी अपेक्षित असल्याने सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात महसुली उत्पन्नाखाली ₹ ५५७.४१ कोटी इतकी तरतूद 'प्राथमिक शिक्षणासाठी शासनाकडून अनुदान' या लेखा शीर्षाखाली प्रस्ताविली आहे.
- **माध्यमिक शिक्षण:** माध्यमिक शिक्षणासाठी शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार ४९ अनुदानित महानगरपालिका माध्यमिक शाळांमधील कार्यरत कर्मचारी वर्गाच्या वेतनावरील १०० टक्के खर्चाची प्रतिपूर्ती शासनाकडून प्राप्त होते. याकरिता सन २०२५-२६ मध्ये महसुली उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाजात ₹ २२३.७१ कोटी तरतूद प्रस्ताविली आहे.

तसेच राज्य शासनाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस दि.३१.०३.२०२४ पर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या खर्चापोटी ₹ ५,२३२.६१ कोटी व माध्यमिक शिक्षणाच्या खर्चापोटी ₹ १,३४८.४७ कोटी अशी एकूण ₹ ६,५८१.०८ कोटी इतकी रक्कम येणे बाकी आहे. याबाबत महानगरपालिका प्रशासनामार्फत राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा सुरु आहे.

**सन २०२५-२६ अर्थसंकल्पीय अंदाजाचे आकारमान (प्राथमिक) ₹ ३९५५.६४ कोटी आहे.**

महसूली अर्थसंकल्प : ₹ ३५४४.३४ कोटी

भांडवली अर्थसंकल्प : ₹ ४११.३० कोटी

आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पावरील, माझे निवेदन संपविण्यापूर्वी मला **'राजर्षी छत्रपती शाहू महाराज'** यांचे पुढील विचार नमूद करावेसे वाटतात.

**' शिक्षण हे केवळ तथ्य शिकण्यापुरते नाही तर ते कौशल्ये आणि मूल्ये विकसित करणे आहे जे आपल्याला परिपूर्ण जीवन जगण्यास मदत करतील.'**

अर्थसंकल्पावरील माझ्या निवेदनाचा समारोप करताना मी सर्वांना आश्वासित करु इच्छितो की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील प्रत्येक बालकास शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास आम्ही नेहमीच प्रयत्नशील राहू. तसेच शिक्षण विभागातील सर्व उपक्रम राबविण्यामध्ये पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारीवृंद यांच्या लाभलेल्या सहकार्य व सहभागाबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या दर्जेदार शिक्षण व सोयी-सुविधा विचारात घेऊन मी आगामी वर्षाचे महसूली व भांडवली उत्पन्न आणि खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज 'ई' (प्राथमिक शिक्षण) निधी संकेतांक ३० तयार केले आहे.

धन्यवाद!

**मुंबई,** **भूषण गगराणी**

**दिनांक : ४ फेब्रुवारी, २०२५** **महानगरपालिका आयुक्त**

# परिशिष्टे

# परिशिष्ट - एक

## महसुली उत्पन्न

(₹ कोटीत )

| अनु. क्र. | महसुली उत्पन्नाची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|
| १ | महसुली कर | ५७१.९१ |
| २ | महानगरपालिका मालमत्तांपासून भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न | ८.८३ |
| ३ | शुल्के आणि उपयोगकर्ता आकार | ५.७१ |
| ४ | विक्री आणि भाडे आकार | ०.२६ |
| ५ | महसुली अनुदाने, अंशदाने व अर्थसहाय्य | ५५८.४६ |
| ६ | गुंतवणुकीपासून उत्पन्न | ४१.८० |
| ७ | अर्थसंकल्प "अ" कडून वैधानिक अंशदान | २७३.२३ |
| ८ | अर्थसंकल्प "अ" कडून विशेष अंशदान | १९७१.७६ |
| ९ | इतर उत्पन्न | ११२.३८ |
| | **एकूण - महसुली उत्पन्न** | **३५४४.३४** |

# परिशिष्ट - दोन

## महसुली खर्च

(₹ कोटीत )

| अनु.क्र. | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|
| १ | आस्थापना खर्च | १२०२.६९ |
| २ | प्रशासकीय खर्च | २४६.३९ |
| ३ | प्रचलन आणि परिरक्षण | २६९.८७ |
| ४ | व्याज आणि वित्त आकार | ०.०२ |
| ५ | कार्यक्रम खर्च | २५.३७ |
| ६ | महसुली अनुदाने, अंशदान आणि सवलती | १७९५.९४ |
| ७ | करांचा परतावा | ४.०६ |
| | **एकूण – महसुली खर्च** | **३५४४.३४** |

## परिशिष्ट - तीन

खातेनिहाय अर्थसंकल्पीय सारांश

(₹ कोटीत )

| खाते संकेतांक | खात्याचे नाव | महसुली खर्च २०२५-२६ | भांडवली खर्च २०२५-२६ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १० | महानगरपालिका सचिव खाते | ०.१८ | ... | ०.१८ |
| १२ | सर्वसाधारण प्रशासन आणि विभाग व्यवस्थापनांशी संबंधित खाती. | ११.९५ | ०.१३ | १२.०८ |
| १३ | प्रमुख लेखापाल खाते (वित्त / कोषागार) | ११०७.९० | ०.०३ | ११०७.९३ |
| २४ | करनिर्धारक व संकलक खाते | १०.३५ | ... | १०.३५ |
| ३० | शिक्षण खाते | २४१३.९६ | ३८९.८१ | २८०३.७७ |
| ३४ | यांत्रिकी आणि विद्युत खाते | ... | २१.३२ | २१.३२ |
| ३७ | विकास नियोजन खाते | ... | ०.०१ | ०.०१ |
| | **एकूण** | **३५४४.३४** | **४११.३०** | **३९५५.६४** |

## परिशिष्ट - चार

भांडवली कामे अर्थसंकल्प

(₹ कोटीत )

| तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|
| **भांडवली प्राप्ती** | |
| विकास निधी – एमआरटीपी अधिनियम, १९९३ च्या कलम १२४ जे अन्वये | ११०.०० |
| प्राथमिक शाळा इमारत परिरक्षण निधी | ३०१.३० |
| एकूण भांडवली प्राप्ती | ४११.३० |
| वजा - भांडवली खर्च | ४११.३० |
| वर्षभरातील वर्ताळा | --- |

मुद्रक : व्यवस्थापक, महानगरपालिका मुद्रणालय, भायखळा - ४०० ०११